## L. A. BILL No. X OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

१९६१ चा महा. २४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

(शा.म.मु.) एचबी ०५०६–१ (२००—७-२०२१)

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " १९६१ चा. असा करण्यात आला आहे) याच्या कलम २६ मधील, पोट-कलम (२) मध्ये, सहाव्या परंतुकाऐवजी, पुढील महा. २४. परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, ३१ मार्च २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी घ्यावयाच्या संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत, संस्थेचे सर्व सदस्य, अन्यथा मतदान करण्यासाठी अपात्र नसतील तर, मतदान करण्यासाठी पात्र असतील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये, पोट-कलम (१अ) मधील, विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या पोट-कलमाची तरतूद, ३१ मार्च २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी घ्यावयाच्या संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत, लागू असणार नाही.".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**४.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप अडचण उद्भवेल त्याप्रमाणे, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०.]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०
यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी
संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी
संमत केल्याप्रमाणे. ]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.